Geography Week Celebrated.

# ‘सन डायल’विषयी माहिती घेत विद्यार्थी थक्क!

## नूतन मराठा महाविद्यालयात भूगोल सप्ताह; २०० वर विद्यार्थ्यांचा प्रदर्शनात सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. २३ : ‘सन डायल’ अर्थात, सावलीचे घड्याळ काय असते, त्यावरून स्थानिक व प्रमाण वेळ कशी काढतात, त्याची उपयुक्तता काय याबाबत कुतूहलाने माहिती जाणून घेत नूतन मराठा महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी स्वत: काही प्रात्यक्षिके केली.

भूगोल सप्ताहानिमित्त नूतन मराठा महाविद्यालयात मराठी विज्ञान परिषद, सायन्स असोसिएशन व भूगोल विभाग यांच्याकडून पोस्टर प्रदर्शन व सूर्यमापी तसेच सावलीच्या घड्याळ्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांच्या हस्ते झाले. पोस्टर प्रदर्शनात, ग्रह-ताऱ्यांचे पोस्टर, खगोलीय माहितीचे पोस्टर, विविध वैज्ञानिकांचे फोटो आणि माहिती, तसेच ग्रह-ताऱ्यांविषयी माहितीचे पोस्टर्स लावले होते.

### स्थानिक वेळ काढली

प्रदर्शनात सावलीचे घड्याळ (sundial)ची प्रतिकृती तसेच पोस्टरद्वारे सविस्तर माहिती देण्यात आली. दोनशेवर विद्यार्थ्यांनी त्याचे निरीक्षण करत सावलीच्या घड्याळावरून स्थानिक वेळ काढली. सावलीच्या घड्याळ्याविषयी खगोल अभ्यासक अमोघ जोशी यांनी विद्यार्थ्यांना विस्तृत माहिती दिली. प्रदर्शनासाठी सायन्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा.आर. बी. देशमुख, भूगोल विभागाचे प्रा.रामचंद्र पाटील, प्रा. राजधर पाटील, डॉ. साळवे, उपप्राचार्य डॉ. के. बी. पाटील यांचे सहकार्य लाभले.



जळगाव : नूतन मराठा महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त आयोजित प्रदर्शनात सावलीच्या घड्याळाविषयी माहिती जाणून घेताना विद्यार्थी.